# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. अभ्यासक्रमाच्या पूर्तीकरिता हा शोधनिबंध सादर करत असताना मला आनंद होत आहे. शिवाजी विद्यापीठाने हा शोधनिबंध सादर करण्याची मला सुवर्णसंधी दिली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

प्रत्येक कार्याच्या पूर्तीसाठी मार्गदर्शन, प्रेरणा यांची आवश्यकता तसेच या कार्यातील अडचणी दूर होणे गरजेचे असते. तरच कार्य अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचते. म्हणूनच माझ्या या शोधनिबंधासाठी मला वेळोवेळी सहकार्य व प्रेरणा देणाऱ्या माझ्या मार्गदर्शिका डॉ. श्रीमती रूपाली उत्तम संकपाळ यांची मी ऋणी आहे. त्यांचे ज्ञान, अनुभव यामुळे हा शोधनिबंध व्यवस्थितरीत्या आणि तर्कसंगतदृष्ट्या सादर करता आला.

शिक्षणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख, डॉ. एम. एस. पद्मिनी यांची संशोधन अभ्यासासाठी प्रेरणा मिळाली, तसेच या विभागातील अनुभवी तज्ज्ञ प्राध्यापक यांचेही मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली. त्याबद्दल मी त्यांचीही आभारी आहे. या शोधनिबंधाचे कार्य करताना बरीच पुस्तके, संदर्भग्रंथ, मासिके, इंटरनेट यासारख्या सुविधांचा वापर करावा लागला. त्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचा बहुमोल उपयोग झाला.

प्रस्तुत संशोधनासाठी कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळेतील विज्ञान विषय शिक्षक व सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांचे सहकार्य मिळाले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

सदर शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी मला माझ्या विभागातील शिक्षकेत्तर कर्मचारी आणि माझे सहअध्ययनार्थी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांची मी मनापासून आभारी आहे.

संशोधन कार्य पूर्ण होण्यासाठी माझे आई-वडील, माझ्या कुटूंबातील इतर व्यक्ती, माझे मित्र यांचे मला जे सहकार्य लाभले त्यासाठी मी त्यांची मन:पूर्वक ऋणी आहे.

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यामध्ये सहकार्य करणाऱ्या सौ. रूपाली बाळासो डाफळे ओंकार टायपिंग सेंटर, सायबर चौक, कोल्हापूर यांनी जास्तीत जास्त अचूक व वेळेवर काम पूर्ण करून दिल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. याशिवाय हा शोधनिबंध सादर करत असताना मला ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य लाभले त्या सर्वांची मी ऋणी आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 26|7|2014

संशोधिका

MNirmal

(निर्मळ मयुरी अशोक)

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY